माहितीचा
अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०२१/२०१७-१८
दि.१७/०३/२०१८.

<u>प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.</u>

श्री.अजित भ. पाटील (सेवा निवृत्त अधिकारी), ................अपिलार्थी
'यश' बंगला, टेंबा रोड, भाईंदर (प.),
ता.जि.ठाणे ४०११०१.

O/C Apalil

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग

## -: <u>विवेचन</u> :-

श्री.अजित भ. पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडे दि.२७/१२/२०१७ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

मनपा सेवेत असताना खालीलप्रमाणे माझ्या वेतनातून टी.डी.एस. कापला आहे.

| आर्थिक वर्ष | कापलेला टी.डी.एस. |
|---|---|
| २००४-०५ | ८८००.०० |
| २००५-०६ | १००००.०० |
| २००७-०८ | २५८००.०० |
| २००८-०९ | २००००.०० |

वरीलप्रमाणे कापलेला टी.डी.एस. आयकर विभागाकडे भरणा केल्याची नोंद मिळत नाही. टी.डी.एस. भरणा केल्याची माहिती/ कागदपत्रे खालील प्रमाणे त्यांच्या प्रती मिळाव्यात.

अ) वर्षनिहाय तपशिलवार प्रत्येक भरणा चलनाची प्रमाणित प्रत मिळावी.

ब) टी.डी.एस. भरणा केल्यानंतर आयकर विभागास सादर केलेले टी.डी.एस. विवरणपत्र (वर्षनिहाय) प्रमाणित प्रत मिळावी.

(सोबत ह्यापुर्वी ०२.११.२०१७ रोजी केलेल्या अर्जाची प्रत जोडत आहे.)

**<u>अपिल दाखल करण्याची कारणे:-</u>**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.३०/०१/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**<u>सुनावणीचा तपशिल:-</u>**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०७/०३/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/२२/२०१८ दि.२८/०२/२०१८ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु, सदर दिवशी मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) हे कार्यालयीन कामकाजासाठी बाहेर गेले असल्याकारणाने सुनावणी रद्द करण्यात आली असुन सदर सुनावणी मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर दि.१७/०३/२०१८ रोजी आयोजित करण्यात आली आहे. तसेच सुनावणीस उपस्थित राहणेबाबत जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार यांना जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/२२/२०१८ दि.२८/०२/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.२७/१२/२०१७ रोजीच्या पत्रानुसार माहिती अधिकार संदर्भात मागविलेली अपेक्षित माहिती आयकर कागदपत्र/ विवरणपत्र/ भरणा चलन प्रमाणित प्रती मला माहिती दिलेली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली असुन मुख्यलेखाधिकारी, लेखा विभाग ह्यांना आयकर विवरणपत्र इत्यादी बाबत आदेश देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: निर्णय :-

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी अपिलार्थी अर्जदारास माहिती दिलेली असुन सदर बाबत मुख्यलेखाधिकारी, लेखा विभाग यांना वेतनातून कापलेल्या टी.डी.एस. शासनाकडे भरणा केल्याची नोंद, चलन व विवरणपत्र (T.D.S.) जतन करण्याबाबत आदेश पारित करण्यात येऊन त्याची एक प्रत अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत उपलब्ध करुन द्यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

O/C

प्रति:-

१) श्री.अजित भ. पाटील (सेवा निवृत्त अधिकारी),
'यश' बंगला, टेंबा रोड, भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.

२) जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.

२०/३/२०१८